## भूमिका :-

राष्ट्रीय सेवा योजना (रा.से.यो.) (एन.एस.एस.) महात्मा गांधीच्या जन्मशताब्दी वर्षापासून (१९६९) सुरु करण्यात आली. ही योजना सुरुवातीपासूनच महाराष्ट्रामध्ये राबविण्यात येत आहे. आज या योजनेमध्ये महाराष्ट्रात सुमारे २,११,७६३ इतके विद्यार्थी/विद्यार्थीनी वरिष्ठ महाविद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयामधून सहभागी झाले आहेत. महाराष्ट्रात ही योजना सुमारे १४०० महाविद्यालयांमधून राबविली जाते.

२या उद्देश पूर्ततेसाठी स्वयंसेवक विद्यार्थी व कार्यक्रम अधिकाऱ्यांना उत्पादक व सकारात्मक अशा कामासाठी एकत्रित केले जाते. श्रमदान, सामाजिक सुधारणा, सांप्रदायिक सद्भावना, सामाजिक संपत्तीची निर्मिती, सहकार्य, रक्तदान, पर्यावरण सुरक्षा, साक्षरता अभियान, आरोग्य शिक्षा अभियान, एड्स निमुर्लन, व्यसन मुक्ती अशा जनजागरण अभियानात स्वयंसेवक विद्यार्थ्यांना सहभागी करुन घेण्यात येते. या योजनेत प्रत्येक स्वयंसेवकाला दोन वर्षामध्ये २४० तास सामाजिक कार्य करावे लागते. तसेच दोन वर्षातून एकदा दत्तक गावी १० दिवस निवासी शिबीरात सहभागी व्हावे लागते.

रा.से.यो. स्वयंसेवकांना व कार्यक्रम अधिकाऱ्यांना, महाविद्यालय तसेच विद्यापीठांना रा.से.योजनेव्दारे केल्या गेलेल्या ऐच्छिक सेवेला मान्यता प्रदान करण्यासाठी या योजनेंतर्गत प्रोत्साहन म्हणून पुरस्कार प्रदान करण्यात येतात.

## लक्ष :-

राज्य स्तरीय रा.से.यो. पुरस्कार योजनेचे खालील लक्ष आहे.

विद्यापीठ व रा.से.यो. कक्ष कार्यक्रम समन्वयक/कनिष्ठ/वरिष्ठ महाविद्यालय व कार्यक्रम अधिकारी तसेच रा.से.यो. स्वयंसेवक( कनिष्ठ/वरिष्ठ महाविद्यालय) यांना त्यांनी केलेल्या उत्कृष्ट सामाजिक सेवेला मान्यता प्रदान करणे.

युवक रा.से.यो. विद्यार्थी स्वयंसेवकांना सामाजिक सेवा व सकारात्मक सामाजिक प्रवृत्ती आणि मुल्यांव्दारा त्यांच्या व्यक्तिमत्व विकासास प्रोत्साहन देणे.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या रौप्य महोत्सवी वर्षापासून महाराष्ट्र शासन व केंद्र शासन यांचेकडून राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल विद्यापीठ, कार्यक्रम समन्वयक, महाविद्यालय (एकक), कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवक यांना दरवर्षी राज्यस्तरीय व राष्ट्रीय पुरस्कार देण्यात येतात. शैक्षणिक वर्षामध्ये व मागील ३ वर्षामध्ये ज्या विद्यापीठ/कार्यक्रम समन्वयक/महाविद्यालय/कार्यक्रम

अधिकारी/स्वयंसेवकांनी रासेयोमध्ये उत्कृष्ट कार्य केले आहे त्यांची राज्य स्तरीय पुरस्कारासाठी निवड करण्यात येते. तसेच केंद्र शासनाच्या मागणीनुसार उत्कृष्ट प्रस्ताव राष्ट्रीय स्तरावरील इंदिरा पुरस्कारसाठी पाटविण्यात येतात.

## पुरस्काराचे प्रस्ताव पाठविताना प्रस्ताव पाळावयाच्या सूचना

१. पुरस्कारासंबंधीची योग्य ती माहिती सर्व महावद्यिालयांना वेळेत पाठविण्यात यावी.

२. महाविद्यालयांकडून/स्वयंसेवकाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाची विद्यापीठ पातळीवरील समितीकडून छाननी करुन उत्कृष्ट प्रस्तवा शासनाकडे पाठविण्यात येतील.

❖ **विद्यापीठ स्तरीय निवड समिती**

| | |
|---|---|
| मा. कुलगुरु | अध्यक्ष |
| कुलसचिव | सदस्य |
| संचालक विद्यार्थी कल्याण विभाग | सदस्य |
| संचाजक महाविद्यालय व विद्यापी विकास मंडळ | सदस्य |
| विख्यात सामाजिक वैज्ञानिक किंवा एक विख्यात सामाजिक कार्यकर्ता (राजकारणाशी संबंधित व्यक्ती नसावी) | सदस्य |
| कार्यक्रम समन्वयक | संयोजक |

३. महाविद्यालय/स्वयंसेवक यांचा प्रस्ताव पाठविताना प्रत्येकी एकच प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा. **एकापेक्षा जास्त प्रस्ताव पाठविल्यास कोणत्याही प्रस्तावाचा विचार केला जाणार नाही.**

४ प्रस्तावामध्ये खालील गोष्टींचा समावेश असावा :-

- अनुक्रमणिका ; प्दकमगद्ध
- इंग्रजी/मराठी नमुन्यातील अर्ज ; Proforma in English/Marathi)
- नियमित कार्यक्रमाची माहिती ; Regular Programmes)

- विशेष शिबीर कार्यक्रमाची माहिती (Special Camping)
- नाविन्यपूर्ण कार्यक्रमाची माहिती ;Innovative Programmes)
- इतर काही कार्यक्रमाची माहिती ;Any other Programmes)
- प्रत्यक्ष समाकार्य करताना घेतलेली काही छायाचित्रे (Few Action Photographs with titles)
- वृत्तपत्र कात्राणे (Press Clippings)
- प्रमाणपत्र/प्रशंसा पत्र (Certificates/Appreciation letters if any)

विद्यापीठ व महाविद्यालयाच्या प्रस्तावासोबत मागीकल वर्षाचे लेखापरीक्षण केलेले लेखे (छायाप्रत) जोडावे. ;सैंज ल्मंते ।नकपजमक ैजंजमउमदज व ि।बबवनदजे ;ग्मतवगद्ध पद बेंम व ि न्दपअमतेपजल ंदक ब्वससमहमद्ध

५. प्रस्तावाच्या मुखपृष्ठावरील मजकूर खालीलप्रमाणे असावा.

**इंग्रजी मुखपृष्टावर**

- च्तवचवेंस वित छंजपवदंस ैमतअपबम ैबीमउम प्दकपतं ळंदकीप छंजपवदंस ६ैजंजम स्मअमस ।ूंतके
- न्दपअमतेपजलध्ब्वससमहमध्च्तवहतंउउम ब्व.वतकपदंजवतध्च्तवहतंउउम व्पिबमतध्टवसनदजममत दंउम ंिवनसक ंचचमंतण

**मराठी मुखपृष्ठावर**

- राज्सस्तरीय रा.से.योज. पुरस्कारासाठी प्रस्ताव.
- महाविद्यालय/कार्यक्रम समन्वयक/कार्यक्रम अधिकारी/विद्यार्थी स्वयंसेवक.

६. मराठी प्रस्तावाची एक प्रत व इंग्रजी प्रस्तावाची एक प्रत असे दोन प्रस्ताव

पाठविण्यात यावेत.

७. मराठी प्रस्तावामध्ये नमुना अर्जासह इतर अनुषंगित माहिती देखील मराठीतच असावी, त्याचप्रमाणे इंग्रजी प्रस्तावामध्ये इंग्रजी नमुना अर्जासह इतर अनुषंगिक माहिती देखील इंग्रजीतच असावी.

८. प्रस्तावामधील मजकूर टंकलिखित केलेला असावा.

९. प्रस्ताव कोणत्याही परिस्थितीत ६० पानांपेक्षा जास्त नसावा. प्रस्तावामध्ये फक्त महत्वाच्या महितीचा समावेश असावा.

१०. नमुन्यामध्ये निर्धारित केलेल्या जागेवर संबंधित अधिकाऱ्यांची स्वाक्षरी व शिक्का असावा.

११. अपूर्ण असलेले व अंतिम तारखेनंतर प्राप्त झालेले प्रस्ताव कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत.

१२. कार्यक्रम अधिकरी/स्वयंसेवकांचे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर प्राप्त प्रस्तावांची छाननी करुन त्यापैकी उत्कृष्ट प्रस्तावांची निवड करुन/मुलाखती घेतल्यानंतर विद्यापीठ स्तरावरील निवड समितीव्दारे प्रत्येकी एक मराठी व एक इंग्रजी प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात येईल.

१३. वरील प्रस्ताव पाठविताना ए/४ आकाराच्या कागदावर माहिती एकत्रित करुन ती स्पायरल बाईंडिग करुन पाठवावी.

१४. शासनाकडे प्रस्ताव पाठविला म्हणजेच पुरस्कारासाठी निवड झाली असे समजण्यात येऊ नये.

१५. कार्यक्रम समन्वयक,कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवक यांनी प्रस्ताव पाठविताना प्रस्तावाच्या नमुन्यावर (मराठी व इंग्रजी) एक/एक तिकिटाच्या आकाराचे (नजिकच्या काळातील) रंगीत छायाचित्र जोडावे व दोन छायाचित्रे (स्टेपल न केलेली) अर्जासोबत पाकीटामध्ये बंद करुन पाठवातीत.

१६. प्रस्तावा व्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रकारची शिफारस शासनाकडे केल्यास त्या प्रस्तावाचा विचार केला जाणार नाही.

१७. दिनांक ३० जून, २००३ पूर्वी रासेयो कार्यक्रम समन्वयक यांच्याकडे प्रस्ताव पाठविण्यात यावेत.

१८. राष्टीय सेवा योजना प्रस्ताव सादर करताना मागील ३ वर्षामध्ये ए. टी. के. टी. किंवा नापास झालेल्या विघार्थी/स्वयंसेवक यांचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात येउ नये.

१९. ज्यांना मागील दोन वर्षामध्ये पुरस्कार प्राप्त झालेले आहेत त्यांचा चालु वर्षाच्या पुरस्कारासाठी विचार केला जाणार नाही.